# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे

दिनांक ०९.०२.२०२६

**नितीन इंगळे, उप अभियंता, विद्युत उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ८,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र.** | धुळे शहर पो.स्टे. गुरनं. /२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दि** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि.०९.०२.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | नितीन दत्तात्रय इंगळे, वय ५३ वर्षे, उप अभियंता, विद्युत उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | तडजोडीअंती ८,००,०००/- रुपये |

**थोडक्यात हकिगत :-** तक्रारदार हे शासकिय विद्युत ठेकेदार असुन त्यांचे रजिस्टर फर्म आहे. सदर फर्मच्या नावाने तक्रारदार शासनाच्या विद्युत कामांचे ठेके घेतात. तक्रारदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), धुळे अंतर्गत नंदुरबार जिल्हयातील धडगांव तालुक्यातील २८ गावात /पाडयात एलईडी सोलर स्ट्रिटलाईट बसविण्याचे प्रत्येकी ८,४९,४७७/- रुपयांचे एकुण जीएसटी वगळता २,३७,२९,३५६/- रुपयांची निविदा मंजुर होवुन कामाची वर्क ऑर्डर मिळवुन सदरची कामे मुदतीत पुर्ण केली होती. सदर कामांच्या बिलापैकी तक्रारदार यांना मार्च २०२५ मध्ये ४१,००,०००/- रुपयांचे बिल अदा करण्यात आले होते. सदर बिल अदा करण्याच्या मोबदल्यात लोकसेवक उप अभियंता, विद्युत उप विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी तक्रारदार यांच्याकडुन ८०,०००/- रुपये घेवुन उर्वरीत ३०,०००/- रुपये पुढील बिल अदा केल्यानंतर द्यावे लागतील असे तक्रारदार यांना सांगितले होते. त्यानंतर तक्रारदार यांना डिसेंबर २०२५ मध्ये त्यांनी केलेल्या उर्वरीत कामाचे २,०२,०५,५२५/- रुपये तक्रारदार यांच्या फर्मच्या बॅंक खात्यात अदा करण्यात आले होते.

त्यानंतर उप अभियंता, विद्युत उप विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांना बिल अदा केल्याच्या मोबदल्यात ८,५०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन पैसे दिल्याशिवाय पुढील कामांच्या बिलांवर सहया करणार नाही, असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि.२७.०१.२०२६ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.२७.०१.२०२६ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता लोकसेवक नितीन इंगळे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ८,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते. त्यानंतर दि.०९.०२.२०२६ रोजी झालेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक नितीन इंगळे, उप अभियंता, विद्युत उप विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांना तक्रारदार यांच्याकडुन ८,००,०००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| **तपास अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | श्रीमती पद्मावती कलाल, पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

| | | |
|---|---|---|
| **संपर्क पत्ता** | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे |
| **संकेतस्थळ** | :- | acbmaharashtra.gov.in |
| **ईमेल** | :- | dyspacbdhule@gmail.com |
| **टोलफ्री क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२५६२-२३४०२० |
| **व्हॉटसअॅप क्रमांक** | :- | ७७९८१६१०६४ |